डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

तरुण भारत
सातारा
www.tarunbharat.com
✦ ₹ ५.०० सोमवार दि. १० सप्टेंबर २०१८ बेळगाव • गोवा • मुंब

# कब्बडी स्पर्धेत भोसले महाविद्यालयाचे वर्चस्व

वार्ताहर
कोरेगाव

शिवाजी विद्यापीठाअंतर्गत सातारा विभागीय कब्बडी स्पर्धा दौलतराव अहिर महाविद्यालय, कराड या ठिकाणी उत्साहात पार पडल्या. सदर स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील २८ महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता.

अत्यंत चुरशीच्या व अटीतटीच्या झालेल्या डी.पी. भोसले महाविद्यालयाच्या संघाने यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा, आर. एस. एस. महाविद्यालय औंध, वेण्णूताई चव्हाण कॉलेज कराड, आमदार शशिकांत शिंदे कॉलेज मेढा व अंतिम स्पर्धेमध्ये शिवनगर महाविद्यालय रेठरे या संघावर मात करून रोमहर्षक विजय मिळविला. डी. पी. भोसले महाविद्यालयाने सर्वोच्च मानाचे दोन चषक पटकावले.



कोरेगाव : कब्बडी स्पर्धेत मिळविलेल्या विजयी चषकासमवेत अध्यक्ष डॉ. अनिल पाटील, प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे, प्रा. बी.डी. भोसले व इतर.

क्रीडा क्षेत्रामध्ये अग्रेसर असणारे रयत शिक्षण संस्थेचे कोरेगाव येथील डी.पी. भोसले महाविद्यालय पहिल्यांदाच कब्बडी या खेळामध्ये विभागीय चॅम्पियनशीप पटकवून एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

**आगामी स्पर्धा जिंकण्याचा निर्धार**

सदर स्पर्धेमध्ये विजयी झाल्यानंतर खेळाडूंचे व क्रीडा शिक्षक प्रा. बी. डी. भोसले, ए. बी. मुजावर, कब्बडी प्रशिक्षक अक्षय हणमंत देशमुख यांचे रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिल पाटील, सचिव प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे, सहसचिव व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी अभिनंदन करून आंतरविभागीय कब्बडी स्पर्धेसाठी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या आहेत. याप्रसंगी विजेत्या खेळाडूंनी पुढीची स्पर्धा जिंकण्याचा निर्धार केला आहे.